# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्रमांक:०२२-२२०२३३६१
ईमेल-gadproto-mh@nic.in
Fax No.०२२-२२२८२६२६

क्रमांक:-संकीर्ण-१४23/प्र.क्र.११९/३१-ब
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: -१२ डिसेंबर, २०२३.

प्रति,

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय :- शासनाच्या संकेत स्थळावर माहिती प्रसिध्द करण्याबाबत

महोदय,

राजशिष्टाचार विभागाच्या अधिपत्याखाली प्रशासकीय, तसेच आस्थापना व लेखाविषयक अनुभव असलेल्या व शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या १ कक्ष अधिकारी/अवर सचिव यांची एक वर्षाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. त्या अनुषंगाने वर्तमानपत्रामध्ये जाहीरात देण्यात आली असून, शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावयाची माहिती सोबत जोडली आहे. कृपया शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी.

आपला,

(दिलीप देशपांडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सोबत : वरीलप्रमाणे.

C:\Amol\करार पध्दतीने नियुक्तीबाबत\जाहिरात प्रसिध्द करणेबाबत..Docx

शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची माहिती
राजशिष्टाचार, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

**विभागाची आवश्यकता:-**

राजशिष्टाचार विभागाच्या अधिपत्याखाली प्रशासकीय तसेच आस्थापना व लेखाविषयक अनुभव असलेल्या व शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अधिकाऱ्याची राजशिष्टाचार शाखा, सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत एक वर्षाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी | आवश्यक अर्हता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | कक्ष अधिकारी/अवर सचिव पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी | राज्य शासनाच्या सेवेतील कक्ष अधिकारी/अवर सचिव पदावरुन सेवानिवृत्त झालेला अधिकारी | १ |

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार जास्तीत जास्त एक वर्षासाठी करण्यात येणार असून त्याबाबतचे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीसाठी ही नियुक्ती राहील.

२) विभागास आवश्यकता असलेली अर्हता धारण करणाऱ्या वय वर्षे ६५ च्या आतील सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

४) आवश्यक अर्हता धारण करणा-या इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांनी सदर पदाकरीता अर्ज विहित नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलिखित करावा.

५) आवश्यक अर्हता धारण करणा-या उमेदवाराने सदर पदाकरीता अर्ज सदर जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत उप सचिव (राजशिष्टाचार), ३ रा मजला, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. या पत्त्यावर पोहोचतील अशा रितीने टपालाने अथवा व्यक्तीशः आणून द्यावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२३३६१ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

६)	विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या अधिका-यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जावर विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

७)	मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल व त्याबाबतची नामिकासूची (पॅनेल) तयार केली जाईल. या सूचीतील योग्य उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

८)	करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस राजशिष्टाचार उप विभाग, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल. तसेच विभागाच्या आवश्यकतेनुसार प्रसंगानुरुप अन्य ठिकाणी देखील कामकाज हाताळावे लागेल.

९)	करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी हे प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

१०)	सदर नियुक्तीच्या अनुषंगाने पारिश्रामिक व भत्ते आणि इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

(दिलीप देशपांडे)
उप सचिव, राजशिष्टाचार
सामान्य प्रशासन विभाग, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.